SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
ba.section@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,
महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
ba.section@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

संदर्भ क: शिवाजी वि./बी.ए./परीक्षा/508 दिनांक- ०१/०७/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक
सर्व अभ्यासक्रमाशी निगडीत,
शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय :– मार्च/एप्रिल, 2022 मधील बी.ए भाग 3 मधील एन.एस.एस. या विषयाची व बी.ए भाग 1 मधील शारिरीक शिक्षण या विषयाची गुणांची नोंद संगणक प्रणालीत करण्याबाबत...**

संदर्भ:– SU/ON/Exam./Dy.R/330A, Date: 08 Feb, 2013

महोदय/महोदया,

मार्च/एप्रिल, 2022 या उन्हाळी सत्रातील विद्यापीठा मार्फत घेण्यात येणा–या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा चालू होणार आहेत. तसेच प्रथम वर्षाच्या परीक्षा या महाविद्यालयीन स्तरावर संपन्न होत आहेत. तरी प्रथम वर्षातील व्दितीय सत्राला असणा–या शारिरीक शिक्षण (Physical Education) या विषयाचे तसेच तृतीय वर्ष सहाव्या सत्रास असणा–या एन.एस.एस या विषयाच्या गुणांची नोंद संगणक प्रणालीमध्ये दिनांकः– 08/07/2022 पर्यंत करण्यात यावी.

तसेच नोंद केलेले गुण कन्फर्म करुन त्याची ई–मार्कलिस्ट संबंधित परीक्षा विभागात दिनांक 11/07/2022 पर्यंत सादर करावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**टिप– निकालानंतर प्राप्त गुणांच्या नोंदीसाठी परीक्षा प्रमाद समितीच्या ठरावानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

प्रत 1. सर्व अभ्यासक्रमाशी सर्व संलग्नित महाविद्यालये.
2. आय.टी.सेल विभाग
3. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक परीक्षा विभाग.
4. संबंधित सर्व परीक्षा विभाग

Dr. B. M. Hirdekar
Controller of
Examinations

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/ ON Exam./Dy.R /330 ग. Date :- 8 FEB 2013

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था

विषय :- प्रथम वर्षाच्या सक्तिचे शारीरिक शिक्षण परीक्षेबाबत

महोदय,

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.(सर्व शाखा), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस., बी.ए.बी.एड., बी.डेस., बी.एफ.टी.एम., बी.डी.एफ.सी., बी.आय.डी., बी.एस.डब्ल्यू. या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या दोन्ही सत्रांच्या परीक्षांचे आयोजन महाविद्यालये व विद्यापीठ असे संयुक्तरित्या आपण केलेले असून प्रथम वर्षाचा निकालही जाहीर करण्यात आलेला आहे हे आपणास विदित आहेच.

वरील परीक्षापैकी ज्या अभ्यासक्रमांसाठी १० गुणांची सक्तिचे शारीरिक शिक्षण ही परीक्षा आहे त्या त्या अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षांपूर्वी सक्तिचे शारीरिक शिक्षण ही १० गुणांची परीक्षा आपापल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात यावी. सदर परीक्षा प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या ठरविलेल्या धोरणानुसार महाविद्यालयातील संबधित शारीरिक शिक्षण संचालकांनी घ्यावयाची असून ज्या महाविद्यालयात विद्यार्थी संख्या जास्त आहे अशा महाविद्यालयांनी नजीकच्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक/प्राध्यापक यांना प्राचार्यांच्या अधिकारात नेमून घ्यावेत व महाविद्यालयाच्या ७५ टक्के रक्कमेतून त्यांना विद्यापीठाच्या विहित मानधन दराप्रमाणे मानधन व अनुषंगिक भत्ते देण्यात यावेत.( संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षकनियुक्ती/ एजेई/२९२० दिनांक ०३.१०.२०१२ नुसार मानधनाचे दर प्रथम वर्ष सक्तीचे शारीरिक शिक्षण प्रति विद्यार्थी रूपये ०१/- तसेच २० पेक्षा कमी परीक्षार्थी असल्यास परीक्षार्थी संख्या व किमान मानधन यापैकी जे जास्त असेल ते देय राहील. (किमान मानधन दर ११०/-)

सदर परीक्षेचे गुण रोल नंबरप्रमाणे नोंदवून ती गुणपत्रके प्रथम वर्षाच्या परीक्षा समितीप्रमुखांच्या कस्टडीत ठेवण्यात यावीत व ज्यावेळी लेखी परीक्षेचे गुण (Online Assessment Data Entry Software) मधून अपलोड केले जातील त्यावेळी ते गुण बैठक क्रमांकाप्रमाणे डियुडिसी पोर्टलवर Extra Curricular activity या ऑप्शनमध्ये फिड करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात यावी. सदर गुणांचा लाभ दोन्ही सत्रांच्या कमतरतेसाठी नियमानुसार देण्याची कार्यवाही डियुडिसी प्रणालीतून होईल. सदर परीक्षा त्या त्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सक्तिची आहे हे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. सदर परीक्षेबाबत किंवा डाटा अपलोड करण्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास ०२३१ २६०९३३५ किंवा ९४२०१२९३६६ या क्रमांकावर उपकुलसचिव, ऑन एक्झाम यांचेशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

प्रत :

- संचालक, शारीरिक शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
- उपकुलसचिव व विभाग प्रमुख : ऑन एक्झाम, प्री-एक्झाम, पोस्ट एक्झाम

C:\Users\Acer\Desktop\letter from coenew1.doc/mahadeshwar/ 08/02/2013/2:49:20 PM